# कोल्हापूर शहर झोपडपट्टी आणि राजकारण

**अवधुत बाबासो टिपुगडे,** संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**प्रस्तावनाः**

भारतामध्ये शहरीकरण मोठया प्रमाणावर वाढत आहे. भारतातील मोठया शहरामध्ये औद्योगिकरण क्रांतीमुळे मोठया प्रमाणात रोजगार उत्पन्न झाल्याने ग्रामीण भागातील बहुतांश लोक हे शहराकडे स्थलांतरीत झालेले दिसतात. तसेच औद्योगिकरणामुळे भारतात शहराच्या आजूबाजूला असणारी गावे सुध्दा निमशहरीकरण म्हणून ओळखली जावू लागली आहेत. शहरीकरणाच्या प्रक्रियेत औद्योगिकीकरणाला फार महत्व आहे. औद्योगिक आणि सेवा क्षेत्राच्या वाढीचा परिणाम म्हणून शहरीकरणाकडे बघितले पाहिजे. शहरात मोठया प्रमाणात उद्योगधंदे व रोजगाराची साधने उपलब्ध असल्यामुळे ग्रामीण भागातून लोक शहकराकडे स्थलांतरीत होतात पण स्थलांतरीत झालेल्या लोकांपैकी बहुसंख्य लोक हे कमी शिकलेले किंवा निरक्षर व अपूर्व कौशल्य असल्यामुळे त्यांना स्थलांतरीत झाल्यानंतरही रोजगार उपलब्ध झाला तरी त्यांना मिळणारे उत्पन्न हे तुटपुंज्य असते. अशा कमी उत्पन्नातून ते आपल्यात मुलभूत गरजा ही भागवू शकत नाहीत. त्यामुळे त्यांना शहरातील घर भाडयाने किंवा विकत घेणे शक्य होत नाही. परिणामी ते शहरातील मोकळया जागेत झोपडी बांधून राहतात किंवा शहरामध्ये वसलेल्या झोपडपट्टी क्षेत्रामध्ये राहतात. अशा झोपडपट्टीत राहणारे लोकांचा एक झोपडपट्टी समाज म्हणून वर्ग उदयास येतो. शहरामध्ये हे झोपडपट्टीवासीय गरीब असल्यामुळे त्यांना त्यांच्या दैनंदिन आयुष्यात अनेक प्रश्नांना तोंड द्यावे लागते, त्यांच्या पुढे सामाजिक आर्थिक व राजकीय घटकांच्या अनेक समस्या उभ्या असतात अशा वेळेस या समस्यांचा सामना करण्यासाठी शहरातील 'झोपडपट्टीवासीय' म्हणून ते संघटीत होवून आपले प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करतात. झोपडपट्टीवासीयांच्या संघटीतपणामुळे शहरी राजकारणावर त्यांचा प्रभाव पडलेला दिसतो. झोपडपट्टीत राजकीय प्रक्रिया घडताना दिसून येते.

**उद्दिष्टे**

१. झोपडपट्टीवासीयांची राजकीय प्रक्रिया अभ्यासणे.

**कोल्हापूर शहरः**

कोल्हापूर शहराचे क्षेत्र ६६.८२ किलोमिटर आहे. तर शहराची लोकसंख्या ५,४९,२८६ इतकी आहे. सदर शहरात उच्चवर्गीय, मध्यमवर्गीय व गरीब वर्ग वास्तव्यास आहे. यामधील गरीब वर्ग प्रामुख्याने शहरामधील झोपडपट्टीत राहतो. कोल्हापूर शहरामध्ये एकूण १४,७९९ व त्यामध्ये ६७,६४६ एवढे लोक वास्तव्य करतात. कोल्हापूर शहराच्या १२.३२ टक्के लोक हे झोपडपट्टीत राहतात. शहरामध्ये एकूण झोपडपट्टीचा विचार करता एकूण ५४ झोपडपट्टी क्षेत्रे आहेत. यामध्ये ४४ व अनधिकृत १० झोपडपट्टी क्षेत्रांचा समावेश होतो. कोल्हापूर शहरामध्ये महानगरपालिकेचे एकूण ८१ प्रभाग आहेत. यामध्ये प्रत्येक प्रभागातून ८१ नगरसेवक निवडून येतात व ५ नगरसेवक हे स्विकृत नगरसेवक आहेत. शहरातील एकूण मतदान ४,५१,५१० व शहरातील एकूण मतदान केंद्रे ४२१ आहेत. कोल्हापूर शहराच्या राजकारणाच्या संदर्भात झोपडपट्टीवासीयांची राजकीय प्रक्रिया आपणास पुढील मुद्दयांच्या अनुषंगाने अभ्यासता येतील.

**२. झोपडपट्टी : मतपेढी (वोट बँक) :**

कोल्हापूर शहराच्या राजकारणाचा विचार करता कोल्हापूर शहरामध्ये एकूण ५४ झोपडपट्टया आहेत. शहराच्या एकूण लोकसंख्येच्या ११.६० टक्के लोक झोपडपट्टीत राहतात. यांचा प्रभाव हा महानगरपालिकेच्या ८१ प्रभागावरती राहतो व दोन शहरी विधानसभा मतदारसंघावर राहतो. या झोपडपट्टीवासीयांच्या मतदारांना एक गठ्ठा मतदान किंवा मतपेढी (वोट बँक) म्हणून ओळखतात. या एक गठ्ठा मतदानाच्या माध्यमातून झोपडपट्टीवासीय आपल्या हितासाठी, विकसासाठी राजकीय पक्षांवर, उमेदवारांवर, निवडणुकीच्या माध्यमातून प्रभाव टाकताना दिसून येतात. जो राजकीय पक्ष, उमेदवार आपल्या मागण्यापूर्ण करतो त्या पक्षाला, उमेदवाराला आम्ही मतदान करणार अशा पध्दतीने अहवाल करत संघटीत झोपडपट्टीवासीय राजकारणात सहभागी होतात. शहरातील उच्चवर्ग व मध्यमवर्गीय

मतदार कोणत्या पक्षाला मतदान करणार हे सांगता येत नाही. परंतु झोपडपट्टीवासीय मतदान करणार हे त्यांच्या राजकीय सहभागामुळे पटकन लक्षात येते. यावरुन झोपडपट्टीवासियांचे मतपेढीचे राजकारण लक्षात येते.

**३. झोपडपट्टी : दादा**

कोल्हापूर शहरातील राजकारणासंदर्भात आपणास एकूण ५४ झोपडपट्टयामध्ये त्या–त्या झोपडपट्टीतील राजकीय परिस्थिती वेगवेगळी दिसते. प्रत्येक झोपडपट्टीतील लोक हे प्रचारापासून ते मतदान करण्यापर्यंत आपली भूमिका बजावताना दिसतात. यामध्ये झोपडपट्टीतील 'दादांचा' सहभाग लक्ष वेधून घेत असतो. 'झोपडपट्टीतील मतपेढीला दादा लोकांची झालर प्राप्त झालेली दिसते. स्थानिक नगरसेवकापासून ते लोकसत्तेपर्यंतच्या निवडणुकांसाठी येथील मतदान मिळविण्यासाठी शकडो कुटूंबाना आपल्या गटात ठेवण्यासाठी झोपडपट्टीतील 'दादा' ची एकीच शहरात तयार झाली. या दादांनी झोपडपट्टीतील मतदान कसे आपल्या शब्दाबाहेर नाही यांचे गणित शहरातील नेत्यांपुढे मांडत त्यांच्याकडून लाभ उठविलेला दिसून येतो. झोपडपट्टीतील 'दादा' हे झोपडपट्टीतील गरीब लोकांचा फायदा उठवत बडया राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या बडदास्तीने आपला स्वार्थ साधण्यासाठी राजकारण करतात.

**४. झोपडपट्टी : राजकीय पक्ष**

कोल्हापूर शहरातील झोपडपट्टीमध्ये राजकीय पक्षांच्या शाखा स्थापन झालेल्या दिसतात. या राजकीय पक्षांमध्ये कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, शिवसेना, भाजप, आर.पी. आय, कन्युनिस्ट पक्ष इ. पक्षांच्या शाखा असलेल्या दिसतात. झोपडपट्टीतील गरीब लोक हे कोणत्या ना कोणत्या राजकीय पक्षाशी संबंधीत असलेले दिसतात. कार्यकर्ते, सदरचा स्थानिक नेता म्हणून काहीजण पक्षाचे कार्य करताना दिसतात. स्थानिक नेते हे पक्षाच्या उमेदवाराचा प्रचार करणे, पक्षाची ध्येय धोरणे झोपडपट्टीतील लोकांपर्यंत पोहचवणे अशी कामे करतात. सरकारच्या आणि राजकीय पक्ष यात एक प्रकारची राजकीय बांधणी झालेली दिसून येते.

**निष्कर्ष**

कोल्हापूर शहरातील झोपडपट्टी आणि राजकारण समजून घेत असताना शहरी झोपडपट्टी आणि शहरी राजकारण यांचा क्रियान्वये संबंध स्पष्ट होताना दिसून येतात. यामध्ये शहरी झोपडपट्टी ही शहरी राजकारणावर एक प्रभाव पाडताना दिसते. त्यामुळे शहरी राजकारणातील झोपडपट्टी ही मतपेढी म्हणून एक आयाम प्राप्त होताना दिसतो. झोपडपट्टीतील राजकारणात स्थानिक नेत्यांची भूमिका महत्वपूर्ण ठरते. तसेच झोपडपट्टीतील दादा लोकांची भूमिका ही राजकारणाला वेगळा आयाम प्राप्त करुन देताना दिसून येते.

**संदर्भ :**

१. घोरवे सुखदेव, नांगिया खुदेश, (२०१४), 'महानगरातील झोपडपट्टया राहणीमानाची दयनीय अवस्था', सुगावा प्रकाशन, पुणे.
२. फीचर्स युनिक, (२०१३), 'अर्धी मुंबई', समकालीन प्रकाशन, पुणे.
३. श्रृती तांबे, (२०१६), 'वेध शहरांचा, सामाजिक अवकाश, कल्पिते आणि धोरणे', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
४. कोल्हापूर महानगरपालिका विकास आराखडा.
५. कोल्हापूर महानगरपालिका माहिती नोंद पत्रिका.